# महफिल-ए-प्रशांत

# 5

## प्रशांत दांडेकर

# महफ़िल-ए-प्रशांत

पुस्तक पाचवे

प्रशांत दांडेकर

ई साहित्य प्रतिष्ठान

# महफ़िल - ए – प्रशांत 5

लेखन - प्रशांत दांडेकर.

9821947457

prashant.dandekar@rediffmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

eleventh floor, eternity
eastern express highway
Thane, 400604

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई .साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे-

©esahity Pratishthan®2015

# मनोगत

रसिक जन हो, आतापर्यंत ज्या सांगीतिक मेजवान्या झाल्या त्या हिंदी चित्रपट संगीताशी संबंधित होत्या; त्यात मराठी प्रतिभा होतीच पण आजची मेजवानी म्हणजे खास मोदक व पुरणपोळीचा बेत आहे.

सुरेश भट म्हटले कि स्मिताचा उंबरठा आठवतो किंवा जगदीश जी म्हटले कि संध्याचा पिंजरा! पाडगावकर काका म्हटले की तर शब्दरुपी प्राजक्ताच्या सड्यात न्हाऊन निघाल्याची अनुभती मिळते तर सुमनजी आठवल्या की 'जिथे सागरा धरणी मिळते' च्या आनंदलाटा पायाशी घुटमळू लागतात. अभिषेकी बुवा म्हटले कि सुरांची कट्यार कलेजा खल्लास करते. हेलनचा मुंगळा डसला तो उषाताई यांच्यामुळेच.

मला माहित आहे कि मराठी गीते म्हटले की रसिकांना आठवतात लतादीदी, आशाताई, हृदयनाथ, शांता शेळके, ग. दि. मा., बाबूजी वगैरे वगैरे. त्यांच्याशी पण आपण एकरूप होणार आहोतच तेव्हा रसिका, धीर धरी रे धीर धरी. धीरापोटी फळे रसाळ गोमटी!

ज्ञानेश्वर महाराजांनी मराठीची तुलना अमृताशी केली आहे. तेव्हा खास मराठमोळ्या महफ़िल मध्येआपण सर्वजण अमृतधारा अनुभवास तयार रहा.

आपला संगीतप्रेमी

प्रशांत दांडेकर



# अनुक्रम


- ❖ सुन्या सुन्या मैफ़लीत माझ्या : सुरेश भट
- ❖ करवीर नगरीचे अस्सल प्रतिनिधी : जगदिश खेबुडकर
- ❖ आभाळावरही ठसा उमटवणारा पक्षी : सुधीर मोघे
- ❖ शुक्रतारा निमाला : मंगेश पाडगांवकर
- ❖ सूर संगीत यांची जन्मगाठ : अनुराधा आणि अरुण पौडवाल
- ❖ ठहरीए होश मै आ लू, तो चले जाईएगा : सुमन कल्याणपूर
- ❖ तुम्हावर केली मी मर्जी बहाल : उषा मंगेशकर
- ❖ सुरांचा अभिषेक करणारे बुवा : पं. जितेंद्र अभिषेकी

# सुन्या सुन्या मैफिलीत माझ्या तुझेच मी गीत गात आहे

सुरेश भट म्हटले कि आठवतात एक से बढकर एक गाणी. त्यांना गाणी म्हणण्यापेक्षा कविता , गझला म्हणणेच जास्त संयुक्तिक होईल. ' सुन्या सुन्या मैफिलीत माझ्या ' , 'मालवून टाक दीप' , 'मी मज हरवून बसले गं' , 'आज गोकुळात रंग खेळतो हरी ', 'तरुण आहे रात्र अजुनी'... हि सर्व गाणी नसून स्वरलेणी आहेत. प्राजक्ताच्या देठाने लिहिणारा किंवा सूर्य किरणांनी लिहिणारा कवी म्हणून सुरेश भट यांना सर्व जण ओळखतात ते यामुळेच

सुरेश भट यांनी मराठी भाषेत गझल हा काव्यप्रकार रुजवला. त्यामुळेच त्यांना गझल सम्राट असे देखील मानाने संबोधले जाते. त्यांच्या आईला कवितांचा खूप नाद होता. आई मुळे सुरेश भट यांना लहानपणीच मराठी कवितांची आवड निर्माण झाली.

सुरेश भटांची शब्दांवर विलक्षण हुकूमत होती. परंतु त्यांनी शब्दांची आतषबाजी कधी केली नाही. मुलायम शब्दांचा चपखल उपयोग ते उत्कटतेने करत , सोबत तरल भाववृत्ती हळुवारपणे शब्दबध्द करत.

गाताना कोणता शब्द महत्वाचा आहे, कोणती भावना जास्त उठून आली पाहिजे यावर त्यांचे नेहमी बारीक लक्ष असायचे  यासाठी सुरेश भटांचे दोन किस्से इथे सांगावेसे वाटते



एकदा भट साहेब एका महाविद्यालयाच्या वार्षिक महोत्सवाला प्रमुख पाहुणे होते. गायनाचा कार्यक्रम सुरु होता . गायिकाही मन लावून गात होती . भटसाहेबही दिलखुलास दाद देत होते. त्या गायिकेने भट साहेबांचं गाजलेलं " आज गोकुळात रंग खेळतो हरी राधिके जरा जपून जा तुझ्या घरी " गायला सुरुवात केली. गाणं संपलं. अचानक भट सहेब उठले . माईक घेतला आणि म्हणाले " मुली तु गायलीस छान फक्त **हे** गाणं आहे म्हणून मी मधेच बोलतोय की ' राधिके जरा जपून जा तुझ्या घरी ' या ओळीत तुझा भर *जा तुझ्या घरी* यावर होता. पण तसं व्हायला नको . त्याठिकाणी *जरा जपून* हे उठावदार व्हायला हवं. *कारण ते घरी जाणं महत्वाचं नाही तर ते जपणं महत्वाचं आहे.*

सुधाकर कदम यांनी देखील असाच एक अनुभव भटांबद्दल सांगितला आहे. भटांनी कदम यांना 'हा ठोकरुन गेला' व ‘कुठलेच फुल आता पसंत नाही’ अशा दोन गझला

स्वरबद्ध करायला दिल्या पण ‘पसंत नाही’ च्या चाली वर मात्र ‘तू घरंदाज बाईला तमाशात नाचवले’ अशा शेरा भटांनी मारला. पण सोबतच गझलची शब्दानुरुप बंदिश कशी असायला हवी हे कळावे म्हणून मेहदी हसन, फरीदा खानम, गुलामअली यांच्या ध्वनिफिती देऊन त्यांच्या गायकीचा अभ्यास करायला सांगितले. भट साहेब असे बोट पकडून चालायला शिकविणारे हाडाचे शिक्षक होते

गाणे व खाणे यांवर भट साहेबांचे मनापासून प्रेम होते व जे जे उत्तम त्याला दाद देणे हे ते आपले कर्तव्य मानत. एकदा एका परिचितांकडे कामानिमित्त गेले असताना घरातील अन्नपुर्णेने फ्लोवर - मटारचे कढई भरून पोहे केले होते . त्यावर मस्त पैकी ताव मारून व काम संपवून भटांची पावले घराकडे वळली. पण वाटेतच जेव्हा आपण अन्नपूर्णेला दाद द्यायला विसरलो याची जाणीव झाली तेव्हा ते तडक परिचितांकडे परतले व दाद देऊनच तृप्त मनाने घरी परतले

भटांच्या शब्दांमध्ये लोकांमध्ये जागृती निर्माण करण्याची अलौकिक ताकद होती. उष:काल होता होता काळरात्र झाली।। अरे पुन्हा आयुष्याच्या पेटवा मशाली।। हे त्यांचे गाणे म्हणजे आणिबाणीच्या काळातील समर गीतच बनले होते

मराठीची गळचेपी होत असताना, पेटून उठण्यासाठी व मातृभाषेबद्दल जाज्वल्य अभिमान निर्माण करण्यासाठी उपयोगी पडतात ते भटांच्या याच ओळी ... पाहुणे

जरी असंख्य पोसते मराठी, अपुल्या घरीच हाल सोसते मराठी, हे असे कितीक खेळ पाहते मराठी, शेवटी मदांध तख्त फोडते मराठी !" किंवा साय मी खातो मराठीच्या दुधाची , मी कुणांचा उंबरा झिजवु कशाला

सुरेश भट अडीच वर्षाचे असताना त्यांना पोलियोची बाधा झाली होती. त्यामुळे त्याचा उजवा पाय जन्मभरासाठी अधू झाला होता. त्या नंतर त्यांना पुत्र **वि**योगाचे जीवघेणे दुखः देखील झेलावे लागले म्हणूनच कि काय त्यांच्या लेखणी मधून माझिया गीतांत वेडे दु:ख संतांचे भिनावे ; वाळल्या वेलीस माझ्या अमृताचे फूल यावे ...!" अशा ओळी निघाल्या

सुरेश भट हे आपल्या हृदयनाथांचे फाईंड आउट आहे . त्याचे झाले असे कि सुरेश भटांनी लिहिलेल्या कवितांचे एक चोपडे हृदयनाथ मंगेशकरांना एका फुटपाथवर सापडले. त्यातील कविता वाचून त्यांनी सुरेश भटांना शोधून काढले आणि त्यांच्या कवितांना चाली लावून त्या अमर केल्या.

बाळ धुरी आणि जयश्री गडकर यांनी अमृतवेल या कादंबरीवर आधारित चित्रपट काढायचे १९७० च्या सुमारास ठरवले होते आणि संगीतकार म्हणून हृदयनाथ यांना निवडले होते. चित्रपटाची गीते सुरेश भटांकडून लिहून घ्यावीत , असे संगीतकार म्हणून हृदयनाथनी सुचवल्याने मोठे बजेट नसतानाही निर्मात्यांनी या कवीला

गीतलेखनासाठी अमरावतीहून मुंबईत आणून हॉटेलात मुक्कामाला ठेवण्याचे , व मानधन देण्याचे मान्य केले. पण भट काही गदिमा यांच्याप्रमाणे शीघ्रकवी नव्हते. मुक्काम वाढत होता व गीते काही मनात सुचत नव्हती  हॉटेलचे बिल फुगत चालले होते त्यामुळे निरुपायाने हॉटेलचे बिल चुकते करून मंगेशकरांनी भटांना घरी न्यायला टॅक्सीत कोंबले. एवढ्यात भट साहेबाना एक अप्रतिम गाणे सुचले. हॉटेलच्या बिलाच्या कागदापाठीच त्यांनी ते लिहून काढले

पण ते गाणे जयश्री गडकरांच्या नशिबात नव्हतेच. त्या अप्रतिम  गाण्यासाठी दैवाने स्मिता पाटीलचा उंबरठा हा  तितकाच अभिजात  चित्रपट राखून ठेवला होता. ते गाणे होते ... सुन्या सुन्या मैफिलीत माझ्या

भट साहेब जेव्हा लिहायचे तेव्हा ते गीत , कविता किंवा गजल  मास्टर पीस होणार  हि काळ्या दगडावरची रेघ असायची. प्रियकर- प्रेयसीची एकमेकांवरील प्रीती हि त्यांची सर्वात आवडती अभिव्यक्ती होती  त्यामुळेच प्रत्येक लग्नाळू मुलाला व मुलीला सुरेश भट आपलेसे वाटायचे. असे हे प्रेम कवी १४ मार्च रोजी आपल्यातून निघून गेले व ते हि अचानकच. त्यामुळे त्यांच्या प्रत्येक रसिकाला सुन्या सुन्या मैफिलीत माझ्या तुझेच मी गीत गात आहे किंवा तरुण आहे रात्र अजुनी, राजसा निजलास का रे या ओळींचा आसरा घेऊन भट साहेबाना परत बोलवावे असे वाटणे साहजिकच आहे.



**जगदीश खेबुडकर..**

**करवीर नगरीचे अस्सल प्रतिनिधित्व करणारे**

**एक सुरेल व्यक्तिमत्व..**

असे म्हणतात कि दुखः हेच अजरामर कलाकृतींना जन्म देते. वयाच्या १६ व्या वर्षी गांधी हत्येच्या पार्श्वभूमीवर खेबुडकरांचे घर जाळले गेले व तेही त्यांच्या डोळया देखत. याच वेदनेतून त्यांच्या तोंडून जन्मली ती "मानवते तू विधवा झालीस!" हि पहिली वहिली कविता

आकाशवाणीवर १९५६ च्या सुमारास त्यांचे पहिले गीत प्रसारित झाले पण चित्रपट सृष्टीमध्ये त्यांना संधी मिळाली ती तब्बल ४ वर्षानंतर . नामवंत संगीतकार वसंत पवार यांनी खेबुडकरांना चित्रपट गीते लिहिण्यासाठी बोलावून घेतले. १९६० साली "रंगल्या रात्री अशा" या चित्रपटासाठी खेबुडकरांना प्रथम लावणी लिहिण्याची



संधी मिळाली आणि करवीरनगरीच्या प्रतिभेचा वारसा भिनलेल्या या कलावंताने "नांव गांव कशाला पुसता......मला हो म्हणतात लवंगी मिरची..." ही फर्मास लावणी लिहिली. लावणी आणि खेबुडकर यांचे समीकरण मग जमले ते कायमचेच. प्रसिद्ध लावणी सम्राज्ञी सुलोचना चव्हाण यांच्या भाषेत सांगायचे झाल्यास खेबुडकरांनी त्यांच्या पोटापाण्याची सोय कायमची करून ठेवली आहे

पण लावणीच कशाला त्यांनी गाण्यातील प्रत्येक प्रकार... यशस्वीपणे सांभाळला. बालगीतापासून प्रेमगीते, नांदी, पोवाडा, भक्तीगीते, अंगाई गीते, किर्तन, वासुदेव, कोळीगीत, गण, गौळण, वग, हादग्याची गाणी, भजन... असे अनेक प्रकार त्यात अंतर्भूत आहेत.

ग. दि. माडगुळकरांच्या लाघवी शब्दकळेचा वारसा समर्थपणे पुढे नेणारा हा त्यांचा शिष्य.. त्याला १९७३ साली व्ही. शांताराम यांच्या "राजकमल" मध्ये काम

करण्याची संधी चालून आली . शांताराम बापूंनी खेबुडकरांना विचारले,"तुम्ही ज्यांना गुरु मानता अशा ग.दि. माडगूळकरांच्या स्थानी आम्ही तुम्हाला बसवू इच्छितो, तुम्हाला जमेल का?" त्यावर खेबुडकरांनी, "मी कोल्हापूरी मातीचा अभिमान आणि तुमचा विश्वास व्यर्थ घालवणार नाही." असे उत्तर दिले आणि "पिंजरा" या १०० व्या चित्रपटासाठी तब्बल ११० गीते लिहून दिली. त्यातील ११ सर्वोत्तम गीते चित्रपटासाठी निवडली गेली

अंदाजे पस्तीस एक वर्षांपूवीर् खेबुडकरांनी 'गावरानमेवा' या आपल्या गाण्यांच्या कार्यक्रमाचा शुभारंभ पुण्यात केला होता, तेव्हा गदिमा आले होते. त्यावेळी ते म्हणाले होते, 'माडगुळकरांच्या नंतर कोण हा माझ्यासमोरचा पेच या पोराने दूर केला आहे. चेला गुरूच्या पुढे गेला होता हे खुद्द गुरूनेच मान्य करणे या सारखा दुसरा सन्मान तो कोणता असू शकेल?

समिक्षाकारांच्या मते संतकाव्यातील सात्विकता, पंतकाव्यातील भावुकता आणि तंतकाव्यातील उत्कटता यांचा सुंदरसा संगम खेबूडकरांच्या गीत-काव्यात होता. जेव्हा खेबुडकरांना त्यांच्या प्रतिभेबद्दल विचारण्यात आले तेव्हा त्यांचे उत्तर पुढील प्रमाणे होते.. देवाच्या दयेनं मला आख्खं गाणं सुचतं. "रफ' आणि "फेअर' हा प्रकार माझ्याकडं नाही. जी रचना येते, ती अंतिमच असते. ही सारी ईश्वराची कृपा आहे. त्यामुळेच, एकाही गणपतीला न जाता तब्बल १७ मिनिटांचे 'अष्टविनायका तुझा महिमा कसा' हे गाणे मी लिहू शकलो.

त्याच प्रमाणे माझी आईसुद्धा जात्यावर दळताना ओव्या गात असे. वडील रोज संध्याकाळी अभंग म्हणत असत;भारूड, गवळणी म्हणत असत. हे घरातले संस्कार; तसेच गावातले, जत्रेतले, गल्लीतले, घरा-घरांतले सणावाराचे संस्कार, हे सगळे लहानपणापासून आवडीने आत्मसात केले. त्यामुळेच मला हे सर्व गाण्याचे प्रकार जमले

आपण सभोवताली खूप काही बघत असतो , ऐकत असतो ते जर लक्षात ठेवले तर काव्य निर्मिती साठी आपोआपच स्फूर्ती मिळते हे पटवण्यासाठी खेबुडकर म्हणतात .... पिते दूध डोळे मिटुनी, जात मांजराची, मनी चोरट्याच्या का रे भीती चांदण्याची ? यात मी वेगळे काहीच लिहिले नाही. मांजर डोळे मिटून दूध पिते; पण जगाचे डोळे उघडे असतात किंवा "चोराच्या मनात चांदणे' हे मी विद्यार्थिदशेत शिकलेलो आहे. त्याचेच काव्यरूप जन्माला आले!

खेडोपाडीच्या जत्रेत हौसे, गवसे, नवसे असतात. जसा त्यांना तरुणीला धक्का द्यायला आवडतो, तसाच तिला धक्का खायलाही आवडतो. त्या धक्क्याचं गुपित तिला सोळाव्या वर्षी कळतं! व म्हणूनच सोळावं वरीस धोक्याच मध्ये त्यांनी 'आज मला हे गुपित कळलं जत्रंमधल्या धक्क्याचं .. सोळावं वरीस धोक्याचं अशा ओळी लिहिल्या

खेबुडकरांचे असे स्पष्ट मत होते कि , आधी चाल ठरवून नंतर त्यावर गाणं तयार करणं ही गोष्ट त्यांना न आवडणारी होती . कारण ती शुद्ध गुलामगिरी आहे! कुणाचं तरी गुलाम होऊन स्वरांच्या खाली त्या मापाची अक्षरे ठेवत जाणं म्हणजे काव्य नव्हे. त्यामुळं त्या गाण्याला आयुष्य मिळत नाही. पण वेळ पडल्यावर त्यांनी ते हि केले. पण परिणाम मात्र तोच असायचा एक अजरामर गीत. अलिकडच्या काळात अजय-अतुलनं संगीतबद्ध केलेलं मोरया-मोरया हे गाणंही खेबुडकरांचंच आहे. किंबहुना, अजय-अतुलच्या संगीतावर खेबुडकरांनी या गाण्याचे शब्द लिहिले आहेत. यातून त्यांचं शब्द सामर्थ्य सहज लक्षात येतं.

"पिंजरा' या चित्रपटातील हृदयाचा ठाव घेणारी "तुम्हावर केली मी मर्जी बहाल,... हि लावणी, तब्बल ४९ लावण्या नाकारल्या नंतर स्वीकारण्यात आलेली रचना होती . एवढा संयम खेबुडकर यांच्या कडे होता. शरद पिळगावकर यांना वरून लावणी वाटणारी पण आतून नायिकेचे सूडगीत असणारी गीत रचना हवी होती. ते आव्हान हि आपल्या लाडक्या नानांनी यशस्वीपणे पेलले. ज्या लावणीवर रुपगर्विता रेखा मराठी मध्ये थिरकली ती लावणी 'कुठं कुठं जायचं हनिमूनला' हि पण खेबुडकर यांचीच रचना आहे.

स्वतः कधी तमाशा पहिला नाही पण तरी देखील 'या रावजी, बसा भावजी'अशी साद घालणाऱ्या नानांनी लावणीला एका वेगळयाच उंचीवर नेऊन ठेवले.

प्रियकराला भेटल्यानंतर मंजुळा घरी मोरासारखी नाचत येते, हे भालजी बोलता-बोलता बोलून गेलेले शब्द खेबुडकर यांनी पकडले आणि त्यावर त्यांनी रचना केली ... "बाई, बाई मनमोराचा कसा पिसारा फुलला' . नाना असे छोटे छोटे क्लू पकडण्यात खूप माहीर होते

नानांचे स्वरांच्या दुनियेतील भ्रमण एका लंबका प्रमाणे असायचे. 'आली ठुमकत नार लचकत, नाक मुरडत, हिरव्या रानी' किंवा दिसला गं बाई दिसला हे शृंगारिक टोक गाठत असतानाच 'शुभंकरोती म्हणा' किंवा ‘आकाशी झेप घे रे पाखरा’ हे सात्विक, संस्कार दर्शक टोक हि ते सहजच गाठायचे

पिंजरा, साधी माणसं, अष्टविनायक असे अनेक चित्रपट त्यांच्या रचनांमुळे अजरामर झाले . प्राजक्ताच्या फुलासारखे जगताना दुसऱ्याच्या ओंजळीत सुगंधाचा दरवळ दिला की, मागे वळून पाहण्याची गरजच नसते” या विचारसरणीचा अंगीकार आयुष्यभर करत आल्याने मृत्यू पश्चात देखील ते रसिकांच्या मनामध्ये, कानांमध्ये गुंजत राहिले आहेत.

'मला लागली कुणाची उचकी'हे गाणे ऐकल्यावर खेबुडकर तुमची आठवण येणारच असे जणू रसिक सांगत त्यांना विनवत असतात ... तुम्हावर केली मी मर्जी बहाल; नका सोडून जाऊ रंगमहाल

१० मे हा नानांचा जन्मदिवस तर ३ मे हा स्मृती दिन. या निमित्ताने या कवी, गीतकाराला रसिकांचा मानाचा मुजरा



## आभाळावरही  ठसा उमटविणारा पक्षी

शब्दांना दुखः नसते ,

शब्दांना सुख नसते,

ते वाहतात ओझे ,

जे तुमचे आमचे असते


किंवा

आपल्या कवितेला शाश्वत वगैरे मूल्य आहे का, नसल्यास का नाही?

खरं तर असला कुठलाच सोस माझ्या शब्दांना नाही

मी तर म्हणतो खुशाल विरू दे सर्व, हवेत उद्गार विरतात जसे

कारण राणी, पाहिले आहेस का कधी आभाळावर पक्ष्यांचे ठसे?



असे स्वतःलाच समाजाविणारे लोकप्रिय कवी व गीतकार सुधीर मोघे म्हणजे शब्दांमध्ये रमणारे पण तरीही त्यांच्या मध्ये गुंतून न पडणारेआगळे वेगळे व्यक्तिमत्व होते

भले मोघे साहेब शब्दांच्या शाश्वत मूल्याबद्दल अवाजवी विचार करणारे नसोत पण प्रत्यक्षात त्यांची प्रत्येक रचना हि शाश्वतच ठरली. आठवून पहा त्यांची गाणी ... 'रात्रीस खेळ चाले', 'फिटे अंधाराचे जाळे', 'सांज ये गोकुळी', 'दिस जातील, दिस येतील', 'एकाच या जन्मी जणू' आणि अशी अनेक ओठांवर रुळणारी व हृदयावर कायमची कोरली गेलेली इतर गाणी.

सहसा प्रत्येक कलाकार हा फक्त आपल्याच कलाकृतीच्या प्रेमात असतो त्यामुळे जेव्हा सुधीर मोघे यांना इतरांच्या कविताही तोंड पाठ असायच्या तेव्हा आपल्या प्रतिस्पर्ध्याबद्दल त्यांना किती आदर होता हेच त्यातून प्रतीत व्हायचे . या आदरापोटीच

हिंदीतील गीतकार साहीर लुधियानवी यांच्या परछाईयां या काव्यसंग्रहाचे त्यांनी पडछाया या मराठी काव्यसंग्रहात रुपांतर केले

सुधीर मोघे हे जसे उत्तम गीतकार होते तसेच संगीतकार देखील. त्यामुळेच संगीताच्या कोंदणामध्ये कोणता शब्द बसेल व कोणता नाही याची त्यांना कल्पना होती व म्हणूनच त्यांचे गाणे रचनेत बसविताना संगीतकारांना कधी हि शब्दांची मोडतोड करावी लागली नाही

मोघे यांचा जन्म किर्लोस्करवाडीमध्ये 8 फेब्रुवारी 1939 रोजी झाला. तेथील वातावरणाचा, ग्रामीण जीवनाचा, निसर्गाचा त्यांच्या घडणीत फार महत्त्वाचा वाटा होता. वडील कीर्तनकार होते. त्यांचे संस्कार देखील मोघे यांच्यावर झाले. त्यामुळे मातीतील गीतकार अशीही त्यांची ओळख होती. त्यांच्या गाण्यात भारतीय प्रतीके खूप असत . उदाहरण द्यायचे झाले तर हा खेळ सावल्यांमधील 'आला आला वारा' हे गाणे. यात भाताच्या रोपांना त्यांनी नव्या नवरीची उपमा दिली होती. शेतकरी आधी एका छोट्याश्या भागात भाताचे खूप दाणे टाकतात. त्यातून असंख्य रोपे जवळ जवळ उगवतात . ती रोपे तरारून आल्यावर ती अलगद काढून काही ठराविक अंतरावर दुसऱ्या भागांमध्ये परत पेरली जातात . मोघे यांना यात माहेरचे अंगण सोडून सासरच्या अंगणामध्ये पाठवण्यात येणाऱ्या नव्या नवरीचे दर्शन होते ते उगीचच नाही

'विसरू नको श्रीरामा मला' हे गानसम्राज्ञी लता मंगेशकरांना आवडलेले त्यांचे गाणे देखील याच मातीशी नाते सांगणारे आहे

श्रीधर फडके त्यांच्या बद्दल भरभरून बोलतात. फडक्यांनी संध्याकाळचे गाणे हवे असे मोघे यांना सांगितल्यावर त्यांनी "सांज ये गोकुळी‘ हे गाणे लिहून दिले. गाण्यातले शब्द अप्रतिम होते; मात्र त्यांनी दोनच कडव्यांचे गाणे दिले. म्हणून आणखी एक कडवे द्या, असे जेव्हा फडक्यांनी सांगितले तेव्हा ते म्हणाले, की हे गाणे म्हणजे एक चित्र आहे. त्यात पुन्हा कसे रंग भरणार? मात्र हि गोष्ट मोघे विसरले नव्हते . त्यानंतर 8 ते 9 महिन्यांनी ते फडक्यांकडे गेले आणि त्यांनी याचे तिसरे कडवे "पर्वतांची जिथे दूर रांग‘ हे कडवे लिहून दिले. या गाण्यात देखील त्यांनी संध्याकाळी गो - धूळ उडवत परतणाऱ्या गायींचे; अस्सल गावाकडेच दिसणारे दृश्य शब्दबद्ध केले आहे

मन कशात लागत नाही,

अदमास कशाचा घ्यावा.

अज्ञात झ-यावर रात्री.

मज ऐकू येतो पावा.

या ओळी ग्रेस यांच्या.. त्या शब्दांना श्रीधरजींनी चाल बांधली. पण पुढची कविता कळत नसताना पुढे चाल बांधणे श्रीधरजींच्या मनाला काही पटत नव्हते. मग सुधीर मोघे श्रीधरजींच्या मदतीला आले त्यांनी त्या चालीवर 'मन मनास उमगत नाही, आधार कसा शोधावा, स्वप्नातील पदर धुक्याचा, हातास कसा लागावा'. असे शब्द लिहून दिले

त्यांचे शब्द प्रियकर -प्रेयसीच्या प्रेमासाठी जसे होते तसेच हेच प्रियकर -प्रेयसी, नवरा बायको बनल्यानंतर त्यांना कराव्या लागणाऱ्या तडजोडी , हालअपेष्टा यांवर मलम लावण्यासाठी पण होते त्यांची गाणी ... 'दिसलीस तू, फुलले ऋतू उजळीत आशा, हसलीस तू' व 'दिस जातील दिस येतील, भोग सरल, सुख येईल' या गोष्टीची प्रचीती आणून देतील

पण सुधीर मोघे हे अध्यात्मिक तत्वज्ञान सुद्धा सहजच बोलून जायचे. 'जगण्यासाठी आधाराची खरंच गरज असते का? आपण ज्याला आधार मानतो . तो खरोखर आधार असतो का? गडद अंधारातून आपण प्रकाशात येताना . एकटेच येतो. पुन्हा काळोखात विरताना सुद्धा हा एकटेपणाच आपली सोबत करतो मग, ह्या उजेडातल्या प्रवासातच हि वेडी तहान का?' असे निरुत्तर करणारे प्रश्न हि विचारावेत ते पण मोघ्यांनीच.

सुधीर मोघे जेव्हा शब्दांबरोबर खेळता खेळता कंटाळले तेव्हा त्यांना एका वळणावर त्यांच्यातील चित्रकाराची ओळख झाली. आणि मग तेच  शब्द रंग लेऊन, नवीन अनुभती घेऊन त्यांच्या समोर व जगापुढे आले

सुधीर मोघे खरोखरच अष्टपैलू होते. गीतकार, संगीतकार, चित्रकार, नक्षत्रांचे देणे या  लाजवाब कार्यक्रमाचे सादरकर्ते, संवादलेखक असे अनेक पैलू त्यांच्या व्यक्तिमत्वाला होते   पण ते स्वतःला  मात्र कवीच समजायचे.

त्यांच्या सारख्या  कवीने  हे जग सोडून जाणे म्हणजे  त्यांच्या  रसिकांना हे





अवघे जगच निःशब्द  झाल्या सारखे वाटणे  साहजिकच आहे. त्यांच्याच गीताचा आधार घेऊन सुधीरजींना आर्जव करावेसे वाटते कि 'एकाच या जन्मी जणू फिरुनी नवा  जन्मेन मी' या उक्तीचा प्रत्यय त्यांनी आम्हा सर्व रसिकांना आणून द्यावा

## शुक्र तारा निमाला

एकापेक्षा एक सरस कविता व भावगीते यांचा नजराणा पेश करणारे, 'जिप्सी' सारखे सदैव प्रेमाच्या प्रांतात भटकंती करणारे आपले लाडके कवी -गीतकार, मंगेश पाडगावकर ३० डिसेंबरला आपल्या सर्वांना सोडून गेले. त्यांच्या स्मृतींना अभिवादन म्हणून आज हा लेख लिहिताना मनाचे आभाळ आठवणींच्या ढगांनी भरून आले आहे.

आपल्यावर कवितेचे संस्कार कसे घडले हे सांगताना पाडगावकर, आपल्या आईची व गुरुजनांची आठवण आवर्जून काढायचे. विल्सन हायस्कूल'मध्ये वा. ल. कुलकर्णी यांच्यासारखे मराठीचे शिक्षक मला लाभले, त्यामुळे माझा मराठीचा पाया भक्कम झाला, असे कविवर्य मोठ्या आदराने नमूद करायचे. पण त्याआधीही ते आठवण काढायचे, ते आपल्या आईची, इंदिरा यांची. आपली आई ही एक उत्तम कवयित्री होती. तिची एक हि कविता कुठे प्रसिद्ध झाली नाही, तरी अखेरच्या श्वासापर्यंत ती स्वान्तसुखाय कविता करायची. तिच्या कविता वाचूनच आपली शब्दसंपदा वाढली असे त्यांचे ठाम मत होते.




आपल्याला पहिली कविता स्फुरली ती बा. भ. बोरकर यांच्यामुळे, हे सांगताना मंगेश पाडगावकर पार बालपणात शिरायचे. त्यांच्या आत्येभावामुळे, बोरकर पाडगावकरांच्या घरी आले होते व त्यांनी, 'तव चिंतनी मन गुंगुनी, मी हिंडतो रानीवनी' ही कविता वाचून दाखविली होती. या कवितेने लहानग्या मंगेशवर इतके गारुड केले होते कि त्यानंतर ते सतत त्याच ओळी गुणगुणत होते. त्यामुळेच पुढे जाऊन पाडगावकरांना, **'तुज पाहिले तुज वाहिले नवपुष्प हे हृदयातले'** ही कविता सुचली.

‘**धारानृत्य**’हा पाडगावकरांचा पहिला कविता संग्रह; यानंतर त्यांचे **जिप्सी, सलाम, भटकेपक्षी, तुझे गीत गाण्यासाठी, बोलगाणी**, असे अनेक काव्य संग्रह प्रसिद्ध झाले.

आपल्यावर कवितेचे संस्कार करणाऱ्या लोकांप्रती आदर व्यक्त करण्यासाठी पाडगावकरांनी, त्यांच्या ‘जिप्सी’काव्यसंग्रहाला त्यांच्याच शाळेतील शिक्षक व सुप्रसिद्ध साहित्यिक वा. ल. कुलकर्णी यांची प्रस्तावना दिली आहे व त्यांनी हा काव्यसंग्रह बोरकरांना अर्पण केला आहे.

ज्येष्ठ कवी बा. भ. बोरकर यांनी, ‘हा मुलगा पुढे मोठा कवी म्हणून नावारूपाला येईल’असे भाकीत केले होते, जे पाडगावकरांनी आपल्या साधनेने खरे करून दाखविले.

कुमार गंधर्वांचा एक अविस्मरणीय किस्सा पाडगावकर नेहमी सांगायचे. एकदा कुमारांच्या एका मैफलीला केवळ १२-१५ श्रोते उपस्थित होते. त्यात पाडगावकर देखील होते. पाडगावकर कार्यक्रम संपल्यावर कुमार गंधर्वांना भेटले व श्रोत्यांच्या अल्प प्रतिसादाबद्दल त्यांच्या जवळ खंत व्यक्त केली. त्यावर कुमार गंधर्व म्हणाले, ‘अरे मंगेश, मी बाहेर बघून थोडंच गातो, मी तर आत पाहून गातो!’ त्यांचे हे उद्गार ऐकून पाडगावकर क्षणभर स्तब्ध झाले पण त्यातून त्यांना फार मोठा संदेश मिळाला की कला हि प्रसिद्धी, पैसा यासाठी सादर करण्यापेक्षा स्वतःला व्यक्त करण्यासाठी, स्वतःला आंतरिक समाधान मिळवून देण्यासाठी जोपासावी.  आणि हेच तर नेमके त्यांच्या मातोश्रींनी देखील केले होते

व त्यामुळेच की काय पाडगावकरांची कविता थेट मनाला भिडायची कारण त्यात लोक लज्जेला बिलकुल थारा नसायचा.

'शुक्र तारा मंद वारा' हे मंगेश पाडगावकरांचे सर्वात गाजलेले गीत. हे गीत कसे सुचले याचे मार्मिक स्पष्टीकरण देताना कविवर्य म्हणायचे, "माझा जन्म वेंगुर्ल्याचा. डोळयासमोर अथांग समुद्र व कानात त्याच्या लाटांचा आवाज! त्यामुळेच 'शुक्रतारा मंदवारा, चांदणे पाण्यातूनी,चंद्र आहे स्वप्न वाहे धुंद या गाण्यातूनी' असे बोल मला स्वाभाविकपणे सुचले असतील" ‘शुक्रतारा’ हे गाणे खरेतर एकल गीत म्हणून पाडगावकरांनी लिहिले होते पण खळे अण्णांच्या विनंतीवरून त्यांनी ते द्वंद्व गीतामध्ये बदलून दिले. माई वरेरकर यांच्या सांगण्यावरून हे गीत पाडगावकरांनी श्रीनिवास खळे यांच्यासाठी लिहून पोस्टाने त्यांच्याकडे रवाना केले. मजा म्हणजे हे गाणे रेकॉर्ड होण्याच्या दिवसापर्यंत गीतकार व संगीतकार एकमेकांना भेटले देखील नव्हते. पण प्रत्यक्ष गाणे रेकॉर्ड होण्याच्यावेळी मात्र पाडगावकर व पु. ल. स्टुडियो मध्ये उपस्थित होते

'सांग सांग भोलानाथ पाऊस पडेल का?' सारखे बालगीत रचल्याने हा कवी आपल्या लहानपणीच आपला जिवलग दोस्त बनून जायचा. तर त्याच वेळी 'जेव्हा तुझ्या बटांना उधळी मुजोर वारा' सारखे खास प्रियकराच्या तोंडी असलेले गाणे त्यांना तरुणाईचा

आयकोन बनवून जायचे. पाडगावकरांचे बोल हे असे दाही दिशांमध्ये पुरून उरायचे व थोरामोठ्यांच्या ओठांवर रुंजी घालायचे.

कविवर्य मंगेश पाडगावकर हे त्यांच्या मिश्किल वात्रटिका प्रेक्षकांसमोर सादर करण्यात पटाईत होते. श्रोत्यांची दाद कुठे मिळवायची, हसे व टाळ्या कशा वसूल करायच्या हे त्यांना पक्के माहित होते. पण एकदा त्यांनाच दिलखुलास दाद देण्यास प्रवृत्त केले ते एका पॅथॉलोजी च्या प्रोफेसर डॉ. शर्मा यांनी! त्याचे असे झाले की या अमराठी माणसाने पाडगावकरांचा परिचय करून देताना त्यांच्या **'छोरी'** या काव्य संग्रहाचं नांव चूकून "छूरी" असे वाचले. तेव्हा पाडगावकरांनी त्याच क्षणी त्यांची चूक नजरेस आणली. त्यावर प्रोफेसर प्रसंगावधान राखत पटकन म्हणाले, "छोरी या छूरी क्या फरक पडता है? इफेक्ट तो एक ही है!" यावर पाडगावकरांनी लगेच त्यांच्या या हजरजबाबीपणाला उठून राहून मनस्वी दाद दिली.

एकदा त्यांना प्रश्न विचारण्यात आला की 'पाडगावकर, तुमच्या काव्याचं वैशिष्ट्य़ काय? 'त्यावर त्यांनी विनोदाने उत्तर दिले. 'पाडगावकरांच्या काव्याला दाढी असते.' कविवर्यांमध्ये एक खट्याळ बाळ दडल्याचाच हा पुरावा नाही का? एकदा अशाच एका चाहत्याने पाडगावकरांना प्रश्न केला, "सर, तुमच्यासाठी यशाची व्याख्या काय?"

त्यावर त्यांनी स्वाक्षरी वहीत लिहून दिले; 'आयुष्यात यश हे मिळवावेच लागते; त्यापासून सुटका नाही पण फक्त यशामागे धावण्यापेक्षा जगण्यातला आनंद शोधायला शिका'. हे एकच वाक्य पाडगावकरांचे व्यक्तिमत्व उलगडून दाखवायला पुरेसे आहे नाही का?

लिज्जत साठी मंगेश पाडगावकर कविता लिहायचे. त्याला अनुसरून ग दि मा यांनी त्यावर एक नाजूक चिमटा काढला होता. तो म्हणजे; 'तुझ्या वाचने काव्यच अवघे वीर रसात्मक झाले, घेऊ धजती इज्जत कैसी लिज्जत पापडवाले'

पाडगावकरांच्या कविता,

**'त्याने प्रेम केलं, तिने प्रेम केलं,**

**मला सांगा तुमचं काय गेलं.'**

**'तुम्हीच सांगा, तुम्हीच ठरवा,**

**सांगा कसं जगायचं कण्हत कण्हत की गाणं म्हणत.'**

या त्यांच्या कवितांमधून फक्त प्रेम व सकारात्मकताच ओसंडून वाहायची. म्हणूनच त्यांना पिकल्या पानाचा देठ की हो हिरवा हि उपमा चपखल लागू पडायची.

‘**या जन्मावर या जगण्यावर शतदा प्रेम करावे**’ असे सांगणारे मंगेश पाडगावकर त्यांचे जीवन भरभरून जगले. पण आता मात्र रसिकांना त्यांची उणीव भासणार. खास करून पावसाळा सुरु झाला कि लिज्जत साठी त्यांनी लिहिलेली कविता आपल्या सोबत नसणार आहे. पण चाहत्यांच्या मनात मात्र ‘हिरवा देठ’ घेऊन आलेल्या या कवीच्या आठवणी, शुक्रताऱ्या सारख्या सदोदित चमकत राहणार आहेत.



## अनुराधा आणि अरुण पौडवाल ... सूर संगीत यांची जन्मगाठ

मराठी चित्रपट सृष्टीतील 'शंकर जयकिशन' म्हणून ओळखली जाणारी जोडी म्हणजे अनिल (मोहिले) व अरुण (पौडवाल) या संगीतकारांची जोडी! या जोडीने अनुराधा पौडवाल, सचिन, सुरेश वाडकर व इतर गायक, गायिकांसोबत, मराठी चित्रपट सृष्टी व भावगीतांच्या दुनियेला अनेक सुरेल नजराणे भेट दिले.

हे दोघेही संगीतकार स्वतंत्ररीत्या देखील अत्यंत प्रतिभावान होते. **'ससा तो ससा की कापूस जसा'** या गाण्यातील, ससा व कासवाच्या शर्यतीचे फिलिंग जिवंत करण्यासाठी अरुण पौडवाल यांनी एकोर्डीनचा फार सुरेख वापर केला आहे. अरुण जर एकोर्डीन छान वाजवायचे तर अनिलजी व्हायोलीन! या दोघांची जोडी बनविण्याचे श्रेय जाते ते पंडित हृदयनाथ मंगेशकर यांना. या जोडीचे पहिले गीत होते, **'धुंदीत गंधित होऊनी सजणा'**

'रुपेरी वाळूत माडाच्या बनात ये ना' हे गाणे फक्त अरुणचे आहे, माझे नाही अशी जाहीर कबुली अनिल मोहिते यांनी एका ठिकाणी दिली आहे. पण असा एखाद दुसरा अपवाद सोडला तर इतर वेळी मात्र अनिल व अरुण ही जोडी एकत्रच काम करायची. उदाहरण द्यायचे झाल्यास 'शोधू मी कुठे कशी प्रिया, तुला?' या गाण्यातील मुखडा अरुण तर अंतरा अनिल मोहिले यांनी रचला आहे.

अनिल व अरुण पौडवाल वेगवेगळे प्रयोग करण्यात पटाईत होते. 'रुपेरी वाळूत' सारख्या गाण्यात बासरी वगैरे पारंपारिक वाद्ये न वापरता त्यांनी सेक्सोफोन, कोंगो, बोंगो सारखी पाश्चात्य वाद्ये वापरली. या गाण्यात, बोल्ड नायिका तिचे मनोगत व्यक्त करत असल्याने आपण हा प्रयोग केला असे या संगीतकार जोडीचे यावर स्पष्टीकरण होते.

अनुराधा या अरुण पौडवाल यांच्या पत्नी; पण तरी देखील अरुणजी यांनी कधी ही दिग्दर्शक किंवा निर्मात्यांकडे त्यांना प्रमोट केले नाही किंवा कधीही त्यांचे फालतू कौतुक केले नाही

एकदा शरद पिळगावकर अरुण पौडवाल यांना म्हणाले," अरे तुझी बायको इतकी चांगली गाते मला का नाही सांगितले?" या वर अरुणजी म्हणाले," तिला तिच्या

स्वतःच्या गुणवत्तेच्या जोरावर काम द्यायचे तर द्या; मी तिला घ्या म्हणून असे कधीही सांगणार नाही". पुढे शरद पिळगावकर यांच्या चित्रपटामध्ये अनुराधा, **'मी जलवंती, मी फुलवंती '** हे गाणे गायल्या.

जेव्हा अनुराधा अरुणजी यांच्यासाठी गायच्या तेव्हा त्यांची तालीम उत्तम व्हायची पण प्रत्यक्ष रेकॉर्डींगच्या वेळी जेव्हा 'टेक ' शब्द उच्चारला जायचा तेव्हा अरुणजी यांना समोर बघून अनुराधा गांगरून जायच्या. त्याकाळी ऑटो ट्यूनर वगैरे प्रकार नसल्याने प्रत्येक वेळी योग्य त्या सुरात गाणे आवश्यक व तेवढेच आव्हानात्मक असायचे. म्हणूनच मग अरुणजी अनुराधा यांना म्हणायचे, "तुझ्यात आत्मविश्वास नसेल तर गरज नाही की तू गायिका व्हायचा अट्टाहास करावास"

जे पत्नीबाबत, तेच पोटच्या मुलीबाबत देखील असायचं. अरुणजी यांच्या घरी वर्षानुवर्षे नवरात्रीचा उत्सव धूमधडाक्यात साजरा केला जातो. स्वतः अरुणजी अशावेळी पेटीवर संगत करायचे. एकदा जमलेल्या मुलांसमवेत त्यांची स्वतःची मुलगी, कविता देखील आरतीच्या वेळी जोरजोराने झांजा वाजवीत होती. सुरांच्या, संगीताच्या ठेक्यावर त्या झांजा बेसूर वाजत होत्या. तेव्हा अरुणजी कवितेला म्हणाले, "तुझ्या रक्तामध्ये संगीत आहे त्यामुळे तू बेसूर वाजविणे पाप आहे"

या नवरात्री उत्सवामध्येच अरुण व अनुराधा यांची जन्म गाठ बांधली गेली. अरुणच्या वडिलांनी एके दिवशी स्वतःच्या मुलाला सांगितले की, 'अनुराधाला आपल्या घरी उत्सवाला, मी बोलावले आहे असे सांग व इथे आल्यावर तिला, मी च तुला लग्नाबद्दल बोलायला सांगितले आहे असे ही सांग'

उमेदवारीच्या काळात, अरुणजी प्रसिद्ध संगीतकार एस. डी. बर्मन यांचे सहाय्यक म्हणून काम करायचे. एकदा सचिन दा यांनी अरुणजी यांना शिवस्तुती साठी एखादा श्लोक घेऊन यायला सांगितले. ही शिवस्तुती **'अभिमान'** चित्रपटामध्ये लताजी गाणार होत्या. अरुणजी घरी आले; त्यांनी आपल्या आईला एक श्लोक देण्यास सांगितले. पोळया लाटणाऱ्या आपल्या बायकोला म्हणजे अनुराधाला तो श्लोक त्यांनी रेकॉर्ड करण्यास सांगितला. टेप घेऊन अरुणजी जेव्हा सचिनदा यांच्याकडे गेले तेव्हा त्यांना अनुराधाचा आवाज खूप भावला. लताच्या आवाजापेक्षा हाच आवाज ठेवू असे सांगून त्यांनी 'अभिमान' मध्ये अनुराधा यांना ब्रेक दिला

अनुराधा इतक्या सुरेल गायिका असून देखील अनिल -अरुण यांनी कधीही इतर गायिकांवर अन्याय केला नाही हे सांगताना उत्तरा केळकर एक आठवण सांगतात, 'ग

'कुणीतरी येणार येणार ग' ह्या **'अशीही बनवा बनवी'** मधील गाण्यामध्ये त्यांनी मला, अनुराधा यांच्या इतकेच महत्व दिले.

नवीन गायकांना कशाला, जे गायक नव्हते त्यांना देखील अनिल - अरुण यांनी गाण्याची संधी दिली. **'नवरी मिळे नवऱ्याला'** या चित्रपटामध्ये अभिनेता सचिन यांना स्वतःवर चित्रित झालेले एखादे गाणे गाण्याची इच्छा झाली. त्यांनी तसे बोलून दाखवताच लगेचच या संगीतकार जोडीने 'ही नवरी असली' हे गाणे सचिनला दिले.

**'अष्टविनायक'** मध्ये पंडित वसंतराव देशपांडे हे अनिल अरुण यांच्या संगीत दिग्दर्शनाखाली प्रथम गायले. 'प्रथम तुला वंदितो' व 'दाटून कंठ येतो' ही दोन गाणी खूप



गाजली. त्यापैकी 'दाटून कंठ' हे गाणे पहिल्या टेक मध्ये नीट झाले नाही असे वसंतराव यांना वाटले. हे गाणे बैठकीचे असल्याने, ते तसेच रेकॉर्ड करावे असे सगळयांचे मत पडले. मग ताडदेव च्या फ़ेमस स्टुडियो मध्ये १० - १५ प्रेक्षकांच्या पुढ्यात बैठक

मांडून वसंतराव गायले व अनिल अरुण यांच्या कारकिर्दीमधले एक सर्वोत्तम गाणे जन्माला आले

सुधीर फडके, मराठी संगीतचित्रपट सृष्टीतील एक ऋषितुल्य व्यक्तिमत्व! सीमेवरील जवानांसाठी, नागालॅंड येथे कार्यक्रम करण्यासाठी बाबुजींनी अनिल मोहिले यांना बोलावून घेतले. व्हायलिन वाजविण्यासाठी व नोटेशन घेण्यासाठी अनिल यांना खास करून बोलाविण्यात आले होते. 'आम्ही जातो अमुच्या गावा' साठी बाबूजी यांच्यासोबत अनिल जी यांनी सहाय्यक म्हणून काम केले होते. या पूर्वपुण्याई च्या जोरावर अनिल अरुण यांना **'अरे संसार संसार**' मध्ये बाबूजी यांच्याकडून गाणे गाऊन गायची संधी मिळाली. 'विठ्ठ माउली तू, माउली जगाची' या गाण्याने या जोडीच्या शिरपेचात अजून एक मानाचा तुरा खोवला गेला

तर 'रजनीगंधा जीवनी या बहरूनी आली', 'मी वाऱ्याच्या वेगाने आले', 'तळव्यावर मेंदीचा अजून रंग ओला' या सारख्या गाण्यांनी अनुराधा व अरुण या जोडीने कानसेनांच्या हृदयावर राज्य गाजविले

अरुणजी हे आपल्या कलेप्रती खूप निष्ठावान होते. ते जेव्हा लताजी यांच्याबरोबर टूर वर होते तेव्हाच त्यांच्या वडिलांचे निधन झाले. पण टूर अर्ध्यावर सोडून

येणे त्यांना मान्य नव्हते कारण ऑर्केस्ट्रामध्ये तेच फक्त एक की बोर्ड प्लेयर होते व त्यांच्या जाण्याने पूर्ण ऑर्केस्ट्राचे संतलुन बिघडले असते. जसा पती पत्नी देखील तशीच होती

सासऱ्यांचा अनुराधाजींवर खूप जीव होता. आपल्या सुनेने आशा भोसले यांच्यासोबत एकदा तरी गावे अशी त्यांची खूप इच्छा होती. त्यांच्या तेराव्याच्या दिवशीच अनुराधाजी यांना आशाजींबरोबर गायची संधी मिळाली. म्हणूनच सासऱ्यांच्या इच्छेखातर मनावर दगड ठेवून अशा दुःखद प्रसंगी देखील अनुराधा तन्मयतेने गायल्या

माधुरी दीक्षित साठी **'खलनायक', 'दिल** ' अशा चित्रपटांमध्ये मादक गाणी गाणाऱ्या अनुराधा कालांतराने तितक्याच सहजतेने भक्तिगीते गाऊ लागल्या. उत्कृष्ट पार्श्वगायिकेसाठी सलग तीन फिल्मफेअर (**आशिकी, दिल है के मानता नहीं, बेटा**) मिळविणाऱ्या अनुराधा, भक्तिरसामध्ये सुख समाधान शोधू लागल्या व आज ही त्या तिथेच तृप्त, समाधानी आहेत

अनुराधा पौडवाल यांचा जन्म २७ ऑक्टोबर चा तर अरुण पौडवाल यांचा स्मृतिदिन १ नोव्हेंबरचा. आज जरी प्रामुख्याने आपण पौडवाल पती पत्नी यांचे संगीत क्षेत्रातील योगदान पाहिले तरी पुढच्या भागामध्ये अनिल मोहिले यांचे योगदान देखील निश्चितपणे पाहू


91.1 FM

## "ठहरीए होश मै आ लू, तो चले जाईएगा"

सुमन कल्याणपूर म्हणजे मराठी- हिंदी चित्रपटसंगीत क्षेत्रातील गुलबकावलीचे फुल! गुलबकावलीचे फुल अशासाठी की त्यांच्या सारखे सुरेल, सोज्वळ, शांत, व सहनशील व्यक्तिमत्व शोधून सापडायचे नाही.

सुमन कल्याणपूर म्हटले की आठवतात असंख्य गाणी. मग ती 'लिंबोणीच्या झाडामागे चंद्र झोपला' सारखी अंगाई असो कि 'उठा उठा चिऊ ताई' सारखे बाल गीत! 'जिथे सागरा धरणी मिळते' सारखे प्रेयसीच्या मनातील भावना व्यक्त करणारे प्रणय गीत असो कि ' लिंबलोण उतरू कशी, असशी दूर लांब तू, इथून दृष्ट काढिते निमिष एक थांब तू' सारखे आईच्या मनातील, मुलाप्रती असलेले कौतुक व्यक्त करणारे गीत!

सुमनजी यांना लहानपणापासूनच गाण्याचे फार आकर्षण! शाळेत संस्कृतचा पेपर लिहिताना कानावर, पलीकडच्या घरातून सुमधुर गाण्याचे बोल ऐकू आले आणि सुमनजी पेपर लिहिण्याचे सोडून गाणे गुणगुणू लागल्या. ते गाणे होते 'कौसल्येचा राम बाई'



ढाका येथे जन्म झाल्यामुळे कि काय सुमन ताईंच्या आवाजात ढाक्याच्या मलमलीचा तलमपणा व श्रीमंती उतरली होती. हा स्वर्गीय आवाज सर्वप्रथम पारखला तो मलमली आवाजासाठी प्रसिद्ध असलेल्या दुसऱ्या एका महान कलाकाराने म्हणजे तलत मेहमूद यांनी. तलत यांनी सुमन ताई यांना एका कार्यक्रमात ऐकले व '**दरवाजा**' या चित्रपटाद्वारे गायची संधी देऊन त्यांच्यासाठी हिंदी संगीतविश्वाचे दरवाजे सताड उघडून दिले. पण लौकिक अर्थाने सुमन ताई पहिले गाणे गायल्या त्या **'मंगू'** चित्रपटासाठी.

केशवराव भोळे व ज्योत्स्ना भोळे या दाम्पत्याने सुमन जी व यशवंत देव यांना घेऊन 'शुक्राची चांदणी' नावाच्या चित्रपटाची सुरुवात केली होती. पण हा चित्रपट कधी पूर्ण झालाच नाही.

पुढे जाऊन मग मराठीमध्ये वसंत प्रभू यांनी **'पसंत आहे मुलगी'** या चित्रपटाद्वारे सुमनजी यांना रसिकांपुढे आणले. **'भातुकलीचा खेळ मांडला'** या गाण्यामुळे हि सुरेल मुलगी पहिल्याच प्रयत्नामध्ये रसिकांना पसंत पडली.

सुरुवातीला, स्वभावाप्रमाणेच सुमन जी यांचा आवाज कोमल व मृदू होता. पण मग आपला आवाज गाताना, जास्तीत जास्त लोकांपर्यंत सुस्पष्ट पोहचावा या साठी सुमन जी प्रयत्नपूर्वक मोठ्या आवाजात गायला शिकू लागल्या. त्यासाठी त्या आपल्या मैत्रिणीला घेऊन गच्चीवर जात व पाण्याच्या टाकीवर चढून मोठ्याने गात.

जोहरा बाई यांचे 'अखियाँ मिलाके जिया भरमा के', नूरजहा यांचे 'जवा है मोहब्बत' व सुरैय्याचे 'तेरे नयनो ने जादू किया' या गाण्यांनी आपण सुरुवातीच्या काळात भारावून गेलो होतो असे देखील सुमनजी म्हणतात. आर सी बोराल. के सी डे, सेहगल, कानन देवी यांचे गाणे देखील तरुणपणी सुमनजी यांना खूप आवडायचे. पण योगायोग म्हणा कि त्यांची गायन शैली गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांच्याशी इतकी मिळती जुळती निघाली कि बरेचदा कानसेनांचा पार गोंधळ उडायचा की हे गाणे नेमके कोणी गायले आहे. 'ना ना करते प्यार तुम्हीसे' या गाण्याचे श्रेय छायागीत मध्ये लताजी व रफी यांना दिले जात होते. हे बघून सुमनजी यांची कन्या, चारूल ने प्रसार भारतीला फोन केला व त्यांना ही चूक

निदर्शनास आणून दिली. मतितार्थ हाच की लता व सुमन या दोघीही कानाला तितक्याच गोड वाटणाऱ्या गायिका आहेत.

आघाडीच्या अनेक संगीतकारांनी, सुमनजी यांना अवीट गोडीची गाणी गायची संधी दिली पण त्यांचे नाव निघाले कि सर्वप्रथम आठवण येते ती मराठीतील दशरथ पुजारी, अशोक पत्की या संगीतकारांची तर हिंदी मधील हेमंत कुमार यांची. अशोक पत्की यांच्यासाठी सुमनजी नी अनेक सदाबहार रचना गायल्या. **'वाट इथे स्वप्नातील'**, **'केतकीच्या बनी तिथे'**, **'नाविका रे'** हि लिस्ट खूप मोठी आहे. म्हणूनच कि काय अशोक पत्की नेहमी म्हणतात, “सुमन जी माझ्या ‘गॉडमदर’ आहेत.”

‘सुमनताई यांनी गाणे सोडू नये, त्यांनी अजूनही गावे. त्या गाणार असतील तर नवनवीन संगीत रचना करण्यासाठी वाटेल ते कष्ट करण्याची माझी तयारी आहे’ असे पत्की उगाचच नाही म्हणत!

दशरथ पुजारी म्हटले कि आठवतात ती सुमन ताई यांची, **'केशवा माधवा'**, **'नकळत सारे घडले'**, **'आकाश पांघरूनी जग शांत झोपले'** आणि अशीच असंख्य अविस्मरणीय गीते. त्यातली 'केशवा माधवा' हि रचना म्हणजे लोकल ट्रेन मध्ये गाणे गाऊन पोट भरणाऱ्या लोकांची सिग्नेचर ट्यूनच झाली आहे.

'जिथे सागरा धरणी मिळते'' या सुमनजी यांच्या गाण्याने इतकी लोकप्रियता मिळविली की 'पुत्र व्हावा ऐसा' च्या निर्मात्याचे झालेले बहुतांशी नुकसान फक्त या गाण्याच्या रोयल्टीमुळे भरून निघाले

एकदा बाबुजींनी सुमनजी यांना रिहर्सल साठी बोलाविले. सुमनजी आल्या खऱ्या पण भरपेट जेवून. त्यांनी बाबूजींना विनंती केली, "आज जेवून आल्याने रिहर्सल नको पण तुम्ही मला गाणे गाऊन दाखवा. मी ते आत्मसात करेन" बाबूजी तयार झाले. सुमन ताई नंतर रेकॉर्डिंग ला आल्या व ते गाणे एका टेक मध्ये ओके केले. ते गाणे होते, मुंबईचा जावई मधील 'कशी करू स्वागता'

सचिन दा यांच्या दिग्दर्शनाखाली गायलेले **'छोडो छोडो मोरी बैय्या'** हे त्यांचे गीत देखील खूपच प्रसिद्ध झाले होते. पण 'बात एक रात की' मधील गाण्यामुळे त्या खऱ्या अर्थाने प्रसिद्धीच्या झोतामध्ये आल्या.

हेमंत कुमार व सुमनजी यांचे नाते देखील आगळे वेगळेच होते **'बात एक रात की'** मधील **'न तुम हमे जानो** ' हे गाणे मेल व्हॉईस मध्ये हेमंतदा तर फिमेल व्हॉईस मध्ये सुमनजी यांनी गाऊन अजरामर करून ठेवले आहे. हेमंत कुमार यांनाच सुमन कल्याणपूर व लता यांना एकत्र गायला लावण्याचे श्रेय दिले जाते. **'कभी आज कभी कल'** या गाण्यासाठी

या दोघी गुणी गायिका एकत्र गायल्या ते हेमंतदा यांच्या संगीत दिग्दर्शनाखाली **'चांद'** या चित्रपटासाठी

रफी व लता यांच्यातील दुराव्यामुळे सुमनजी यांच्या वाट्याला काही सुरेख द्वंद गीते आली. त्यांची व रफी साहेबांची अनेक गीते आजही रसिकांच्या हृदयामध्ये विराजमान आहेत. "**ना ना करते प्यार तुम्हीसे कर बैठे**", "**ठहरीए होश मै आ लू, तो चले जाईएगा**", "**आजकल तेरे मेरे प्यार के चर्चे**" या गाण्यांमधील दोघांची केमिस्ट्री लाजवाब आहे; नाही का?

फक्त रफी सोबतचीच नाही तर  सुमनताई यांची इतर अनेक युगुलगीते देखील तितकीच गाजली. म्हणूनच सुमन ताईंना त्यांचे सहकारी (पुरुष) गायक लकी मानायचे

प्रत्येक गायकाला त्याचे एखादे तरी गीत इतर गीतांपेक्षा काकणभर जास्त आवडत असते. तसेच सुमन ताईंचे पण आहे. '**चले जा, चले जा, चले जा, जहाँ प्यार मिले**' हे त्यांचे सर्वात आवडते गाणे आहे. शंकर जयकिशन यांच्या संगीत दिग्दर्शनाखाली गायलेले हे गीत रसिकांच्या ओठावर देखील रेंगाळत असतेच.

**'अजहु न आए बालमा'** सारखे शास्त्रीय अंगाने जाणारे गीत असो कि **'बाद मुद्दत से ये घडी'** सारखी गजल असो, सुमन ताई कोणतेही गाणे लीलया गाऊ शकायच्या पण पारंपारिक वातावरणातून आल्यामुळे सुमन ताई यांनी मुजरा किंवा कॅब्रे नंबर गाणे शक्यतो टाळले. मराठी भाव गीते तर त्यांनी इतकी गायली आहेत की मराठी रसिक त्यांच्या सुरांमध्ये चिंब न्हाऊन निघाले आहेत.

सुमन ताई स्वतः शाकाहारी होत्या पण घरातील इतरांची मर्जी राखण्यासाठी त्या ओम्लेट करायला शिकल्या. त्यांना ओम्लेट करायला शिकविले ते संगीतकार रोशन यांच्या बायकोने म्हणजे इराने!

सुमन ताई आपल्या यजमानांचे कौतुक करताना आवर्जून सांगायच्या की, 'त्यांना माझे प्रत्येक गाणे लक्षात होते व त्या गाण्याशी निगडीत सर्व गोष्टी देखील! त्यांच्यामुळेच मी घर व प्रोफेशनल लाईफ मध्ये संतलून राखू शकले'

सुंदर पेन्सिल स्केच काढणे ही सुमन ताई यांची अजून एक हॉबी आहे. मधुबाला, नर्गिस अशा अनेक नायिकांची चित्रे त्यांनी रेखाटली आहेत.

सुमनजी म्हणतात,"शब्दांचा अर्थ सुरांमध्ये उतरला पाहिजे व सूर हे शब्दांच्या अर्थामध्ये मुरले पाहिजेत; हे म्हणजे कैरीचे लोणचे मुरते ना तसे काहीसे झाले पाहिजे" या

त्यांच्या भावनेमुळेच सुमन ताई यांनी गाणे गायचे व श्रोत्यांनी मंत्रमुग्ध होऊन जायचे हे समीकरण बनून गेले. त्याचमुळे जेव्हा सुमन ताई यांनी पार्श्व गायनाला राम राम म्हटले तेव्हा रसिकांच्या ओठावर शब्द तरळले; **"ठहरीए होश मै आ लू, तो चले जाईएगा"**

गदिमा पुरस्कार मिळाल्याने सुमन ताई परत एकदा प्रकाश झोतात आल्या आहेत. पण त्यांच्याच **'घाल घाल पिंगा वाऱ्या'** या गाण्याची आठवण काढून म्हणावेसे वाटते की,' सुमन ताई तुमचे स्वर आमच्या मनाच्या गाभाऱ्यात अष्टौप्रहर पिंगा घालतच असतात व कानात स्वरांची मधुर बरसात करत असतात"

२८ जानेवारी या गुणी गायिकेचा जन्मदिवस; त्यांनी पुढेही असेच गात राहावे हीच ईश्वर चरणी प्रार्थना!



## तुम्हांवर केली मी मर्जी बहाल

असे म्हणतात कि हाताची पाच ही बोटे सारखी नसतात पण मंगेशकर कुटुंबीयांनी हे वचन खोटे ठरविले आहे कारण संगीत क्षेत्रामध्ये या पाच ही भावंडांचे योगदान थोड्या फार फरकाने सारखेच आहे. लता, आशा, मीना, उषा व हृदयनाथ; ही सर्व पाच भावंडे म्हणजे वैयक्तिक रित्या संगीत क्षेत्रातील स्वतंत्र घराणी आहेत. यातील उषा ताई यांना १५ डिसेंबर २०१५ रोजी ८० वर्षे पूर्ण झाली. म्हणूनच आज आपण बघणार आहोत उषा ताई यांची संगीत क्षेत्रातील कामगिरी.

उषा ताई म्हटले कि डोळयांसमोर उभा राहतो तो अनेक गीतांचा कोलाज! त्यात असतात **'पिंजरा'** चित्रपटातील लावण्या, संतोषी मातेवरील सुप्रसिद्ध आरती, **'मुंगळा मुंगळा'** सारखे सो कॉल्ड आयटम सौंग (song) किंवा **'केळीचे सुकले बाग'** सारखे भावगीत देखील.




उषा मंगेशकर म्हणजे एक आगळेच रसायन आहे. कंठात सूर व बोटांमध्ये चित्रकला असे दुर्मिळ कोम्बिनेशन त्यांच्या व्यक्तिमत्वामध्ये दडलेले आहे. या दोन्ही कला आपल्याला कशा अवगत आहेत हे सांगताना उषाजी म्हणतात, 'चित्रकलेची आवड मला लहानपणापासूनच होती. माझा चित्रकलेकडचा नैसर्गिक कल ओळखून राज कपूर व लता दिदींनी मला एम. आर. आचरेकरांकडे चित्रकला शिकायला पाठवले. पुढे जेव्हा लता दीदी व आशा ताई यांच्या प्रोत्साहनामुळे व मार्गदर्शनामुळे मी गाऊ लागली तेव्हा गाण्याचे बोल ऐकून मला चित्राची संकल्पना सुचू लागली.' मुकेश यांचे 'मधुमती' मधील 'सुहाना सफर' गाणे ऐकून आयुष्यात पहिल्यांदा मला पेंटिंग साठी ब्रश हातात धरावासा वाटला असे देखील उषाताई आवर्जून सांगतात. अशा प्रकारे गायनकला व चित्रकला, यांनी एकमेकांच्या सखी बनून उषाजी यांचे कलात्मक जीवन समृद्ध केले.

लता दीदी व उषा ताई यांनी अनेक चित्रपट गीते एकत्र गायली; जशी की, '<u>अपलम चपलम</u> **(आजाद)**', '<u>दुनिया में हम आए तो जीना ही पडेगा</u> **(मदर इंडिया)**' व अजून

ही काही गीते! उषा आपल्यासोबत गाणार म्हटल्यावर दीदींना टेन्शन यायचे पण उषाजी यांनी मात्र कधीच लता नावाच्या ब्रांड चे टेन्शन घेतले नाही.

पंचम दा यांच्या 'बहारोंके सपने' या चित्रपटासाठी लता दीदी गाणार होत्या. पंचम दा प्रयोगशील संगीतकार होते. त्याकाळी ओव्हरलापींग व मिक्सिंगचे तंत्रज्ञान आले नव्हते. तरी देखील **'क्या जानू सजन होती है क्या गम कि शाम'** या गाण्यासाठी पंचमदा यांनी इरेझिंग हेड काढून लताच्याच रेकोर्डिंग वर तिच्याच आवाजात री -रेकोर्डिंग केले. त्यामुळे मुखडा व अंतरा या दोघांमध्ये पार्श्वभूमीला दोन दोन आवाज ऐकू आले पण लोकांना ते खरे न वाटल्याने सुरुवातीला या गाण्याचे श्रेय लता व उषा मंगेशकर असे दोघींना दिले गेले

लता व हृदयनाथ या घरातील दोन संगीतकारांबद्दल बोलताना उषा जी म्हणतात, "दीदी गाणे गाऊन दाखवते तर हृदयनाथ गाणे वारंवार सराव करून पाठ करून घेतो. तसेच हृदयनाथ प्रथम नेमका शब्द शोधतो व नंतर त्या शब्दाला अनुरूप चाल लावण्यासाठी रात्रीचा दिवस करतो." **'शालू हिरवा, पाचूनी मरवा, वेणी तिपेडी घाला '** सारखे गाणे उषाजी नी हृदयनाथ यांच्या संगीत दिग्दर्शनाखाली गायले, जे आजही आपली लोकप्रियता टिकवून आहे.

'कान्हू घेऊन जाय', 'पाऊस पहिला जणु कान्हुला' सारखी अनवट गीते उषा ताई यांनी घरातीलच अजून एका संगीतकारासाठी गायली आहेत. त्या संगीतकाराचे नाव आहे मीना खडीकर

लतादीदीं प्रमाणेच आशाजींच्या सोबत उषा मंगेशकर यांनी अनेक युगुलगीते गायली. 'चित्रलेखा' चित्रपटातील 'काहे तरसाय, जियरा' हे असेच एक प्रसिद्ध गाणे!

उषा ताई, त्यांनी गायलेल्या बालगीतांसाठी देखील बच्चे कंपनीमध्ये मशहूर आहेत, 'ससा तो ससा की कापूस जसा', 'एक कोल्हा, बहु भुकेला' या त्यांच्या गाण्यांनी पिंजरा मधील लावण्यांसारखाच इतिहास घडविला आहे.

उषा मंगेशकर म्हटले कि हटकून आठवतात ती त्यांची दादा कोंडके यांच्या चित्रपटातील, 'बाई ग! केळेवाली', 'काय ग सखू ? बोला दाजिबा' सारखी अनेक चटपटीत गाणी. दादा कोंडके यांच्या उमेदीच्या काळात जेव्हा इतर गायिका त्यांच्या चित्रपटासाठी गाणी गायला तयार नव्हत्या तेव्हा उषाजी यांनी त्यांना सपोर्ट केले. त्यामुळेच, 'माझ्यासाठी उषा मंगेशकर याच लता मंगेशकर आहेत' असे दादा सर्वांना सांगत. दादा कोंडके आपल्यावर केल्या गेलेल्या उपकारांची जाण ठेवणारे होते म्हणूनच 'मी शेवटपर्यंत

माझ्या चित्रपटांसाठी, तुमचीच गायिका म्हणून निवड करेन' असे वचन त्यांनी उषाजी यांना दिले होते.

गायनाबरोबरच उषा ताई चित्रपट निर्मिती सुद्धा करायच्या; जैत रे जैत या सुंदर चित्रपटाच्या प्रोड्युसर आपल्या उषा ताईच आहेत.

उषा ताई यांनी नेहमीच संगीतापेक्षा घरच्या लोकांसाठी जास्त महत्व दिले. लता दीदी, हृदयनाथ व स्वतःच्या आई साठी त्यांनी सर्वात जास्त प्रार्थमिकता दिली.

लता दिदींवर जो विषप्रयोग झाला त्या नंतर दीदींच्या जेवणाची सर्व जबाबदारी उषा जी यांनी घेतली होती. उषाजी यांनी एका ठिकाणी म्हणून ठेवले आहे की स्वर्गीय गीतकार शैलेंद्र त्यांच्या स्वप्नामध्ये आले होते व त्यांनी दिदींवर स्लो पौयझनिंग करण्याऱ्या व्यक्तीचे नाव त्यांना सांगितले होते.


हृदयनाथच्या प्रत्येक कार्यक्रमाला, सावली सारखे त्यांच्या मागे उभ्या असणाऱ्या उषाजी, स्वतःचे फारच कमी जाहीर कार्यक्रम करतात पण आज ही जेव्हा उषा ताई गाऊ लागतात तेव्हा त्यांचा एकूणच थाट हा, 'तुम्हावर केली मी मर्जी बहाल, नका सोडून जाऊ रंगमहाल' असाच असतो. म्हणूनच त्यांचे रसिक सुद्धा म्हणतात, उषाजी, तुम्ही अशाच स्वर उधळत रहा कारण 'जब जब बहार आए और फुल मुस्कुराए, हमें तुम याद आए'

## सुरांचा अभिषेक करणारे बुवा

पंडित जितेंद्र अभिषेकी संगीताला, गाण्याला वाहून घेतलेले एक दैवी व्यक्तिमत्व! त्यांचे नाव उच्चारले की आठवतात एक से एक अप्रतिम संगीतनाट्ये जशी की **'कट्यार काळजात घुसली ', 'मत्स्यगंधा', 'हे बंध रेशमाचे'**

गोव्यातल्या मंगेशी इथला जन्म; वडील कीर्तनकार, त्यांच्याकडेच बुवांचे संगीताचे आद्य शिक्षण झाले. जितेंद्र अभिषेकी हे बुवा या नावानेच त्यांच्या निकटवर्तीयांमध्ये प्रसिद्ध होते. असे म्हणतात कि बुवांनी २१ गुरु केले.

संगीताच्या तपश्चर्येसाठी खातंपितं घर सोडून, गाव सोडून अभिषेकी बाहेर पडले. खस्ता खात खात ते पुण्याला आले. माधुकरी मागून ध्येय पूर्ण करायला ते धडपडत होते. त्याच ध्येयापोटी ते मुंबईला गेले. केशरबाई बांदोडकर यांच्या घरी राहिले.



अत्यंत परिश्रम करून बुवांनी ग्वाल्हेर, आग्रा आणि जयपूर अशा तीन विविध घराण्याची आत्मसात केली व त्यातून स्वत:ची अशी एक वेगळी गायकी परंपरा निर्माण केली.

बुवा, गुरु शिष्य परंपरेचे एक चालते बोलते प्रतीकच होते. त्यांनी नेहमी स्वतःच्या गुरूंचा आदर केला व शिष्यांचा आपल्या अपत्यांप्रमाणे सांभाळ केला. एकदा बुवांची मैफिलीची तयारी सुरु होती. बुवा तानपुरा लावण्यात मग्न होते. मनासारखा स्वर लागल्यावर आता सुरुवात होणार असे जमलेल्या श्रोतुगणाला वाटत असतानाच बुवांनीच सहज श्रोतृवर्गाकडे पहिले. तेव्हा बुवांच्या लक्षात आले की, समोर गानकोकिळा हिराबाई बडोदेकर सुद्धा उपस्थित आहेत. बुवा उठले आणि व्यासपीठावरून उतरून जाऊन हिराबाईना खाली वाकून नमस्कार केला आणि मग रंगमंचावर येऊन गायला सुरुवात केली. या एका उदाहरणामध्येच सर्व काही आले नाही का?

रंगविलेली मैफिल संपल्यावरचा त्यांचा विरंगुळा म्हणजे लाँग ड्राइव्हला जाणं. ते आणि त्यांचे शिष्य फिरून येत. सूर्योदय आणि सूर्यास्त पाहायला बुवांना फार आवडे. निसर्गाच्या सहवासात ते मनापासून रमत तसेच आपल्या शिष्यांच्या सहवासातही त्यांचा शीण उतरत असे. शिष्यांचे देखील आपल्या गुरुवर विलक्षण प्रेम होते. बुवांच्या वाढदिवसाच्या दिवशी सर्व शिष्यगण जमायचे. त्यांना आंघोळ घालायचे. एकदा तर महादेवाला घालतात तशी पेलाभर दूध घेऊन त्यांनी बुवांना आंघोळ घातली. त्यादिवशी स्वतःच्या हातांनी स्वयंपाक करून चेल्यांनी आपल्या गुरूच्या जिभेचे लाड देखील पुरविले

पंडित अभिषेकी एक स्वरसंपन्न आयुष्य जगले. आपल्याकडचे ज्ञान त्यांनी मुक्त हस्ते वाहून टाकले. अनेक शिष्य घडवले. प्रभाकर कारेकर, अजित कडकडे, फैयाज, देवकी पंडित, शौनक अभिषेकी ही यादी पाहिली की याची प्रचीती येते

मत्स्यगंधा'चे संगीत म्हणजे बुवांच्या प्रतिभेचा सर्वात सुंदर साक्षात्कार आहे. जितेंद्र अभिषेकी यांच्याकडे हे संगीत देण्याची जबाबदारी कशी गेली, याचीही एक गम्मत आहे. संगीतकार वसंत देसाई त्या काळात यश आणि कीर्तीच्या शिखरावर होते. गोवा हिंदू असोसिएशनतर्फे रामकृष्ण नायक, अवधूत गुडे त्यांची भेट घेण्यासाठी एके दिवशी त्यांच्या पेडर रोडवरील निवासस्थानी पोहोचले. वसंतरावांनी 'मत्स्यगंधा'चे संगीत करावे, अशी

त्यांना करण्यात आली. व मत्स्यगंधाची संहिता त्यांच्या हाती देण्यात आली. वसंतरावांनी न पाहताच संहिता बाजूला ठेवून दिली. 'मला देवाचा कौल मिळाल्यास मी विचार करीन,' असे आश्वासन देऊन त्यांनी आलेल्या लोकांची बोळवण केली. अपेक्षेनुसार त्यांच्या नकारासहित संहिता गोवा हिंदूच्या कार्यालयात परतली.

कार्यकर्ते सचिंत मुद्रेने गोवा हिंदूच्या कार्यालयात 'पुढे काय?' अशी चर्चा करत असतानाच गोपाळकृष्ण भोबे तेथे अवतरले. पंडित अभिषेकी योगायोगाने त्याचवेळी त्या ठिकाणी बसलेले होते. वडीलधारे प्रेमाने बुवांना गंपू म्हणत. कार्यकर्त्यांची समस्या ऐकताच भोबे उत्स्फूर्तपणे म्हणाले, 'अरे, विचार कसला करताय! आपल्या गंपूला घेऊन तर बघ!' पुढील भेटीत अभिषेकींनी त्या सर्व कार्यकर्त्यांना सुखद धक्काच दिला. ते म्हणाले, 'संहिता एवढी समर्थ आहे, की संगीताची गरजच नाही. नुसत्या संवादांवर नाटक चालेल.' पण बुवांनी संगीत दिले व त्या संगीताने 'मत्स्यगंधा'च्या यशात तुरा खोवला गेला.

रसिकांना नवल वाटेल की मत्स्यगंधाचे सुरुवातीचे 38 प्रयोग नुकसानीत गेले. पण पुढे जाऊन याच नाटकातील पदे ऐकण्याची अतोनात इच्छा साक्षात बालगंधर्वांना झाली. हलकासा बदल करूनदेखील प्रचलित रागात नवचैतन्य कसे आणावे याची जाण बुवांना होती. उदाहरणच द्यायचे तर 'मत्स्यगंधा'तला यमन रागातील **'देवाघरचे ज्ञात**

कुणाला' या गाण्याचे देता येईल. 'अर्थशून्य भासे मज हा कलह जीवनाचा', आशालता वाबगावकर यांनी गायलेले हे गाणे देखील मत्स्यगंधाचे खास आकर्षण आहे

'कट्यार काळजात घुसली' रसिकांना मिळालेली बुवांची दुसरी देणगी! या नाटकासाठी त्यांना तोलामोलाची साथ मिळाली ते स्वर्गीय वसंतराव देशपांडे यांची. बुवा हे प्रयोगशील संगीतकार होते. कट्यार काळजात घुसली या नाटकाची सुरुवात त्यांनी भैरवीने केली होती. 'कट्यार'सारखं नाटक संगीतामुळे चारपाच तास चालू राहता कामा नये याचं व्यवधान त्यांनी सांभाळलं. त्यासाठी तालमी चालू असताना पंडितजी हातात स्टॉपवॉच घेऊन बसत. अनेकदा चालीत अडसर निर्माण करणारे शब्द मूळ पदात असले तर त्यांनी लेखक वा कवीला सांगून ते बदलून घेतले. 'घेई छंद, मकरंद, प्रिय हा मिलिंद' 'घेई छंद, मकरंद, प्रिय हा मिलिंद (दुसरी चाल) , 'तेजोनिधी लोहगोल, भास्कर हे गगनराज','या भवनातील गीत पुराणे' ही गाणी होती म्हणूनच रसिकांच्या काळजात देखील ही कट्यार घुसली

पं.अभिषेकी यांच्या स्वररचनेचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांची गाणी पूर्वीच्या काळातल्या गाण्यांसारखी खूप काळ आळवून आळवून गायली जायची नाहीत. बुवा, तानांची भेंडोळीच्या भेंडोळी गाण्यात टाकण्याच्या विरुद्ध होते. पण प्रत्येक ओळीमध्येच लहान लहान तानांचे सुंदर तुकडे असलेल्या गोड जागा असतील याची मात्र ते खबरदारी

घेत.  एखाद्या गायकाला शास्त्रीय संगीतातली रागदारी चांगली येते म्हणून त्याने त्यात आणखी भर टाकून लांबण लावली तर त्यातले सौंदर्य शिल्लक रहात नाही. पण गायकाचा कस लागेल इतक्या जागा बुवांनीच चाली बांधतांना त्यात पेरून ठेवल्या होत्या.

'हे बंध रेशमाचे' हे नाटक देखील बुवांच्या कारकिर्दीतील एक मैलाचा दगड ठरले. हे नाटक लिहिले आहे रणजीत देसाई यांनी पण नाटयपदे लिहिली आहेत शांता शेळके यांनी. बुवांना खरेतर नाटककार व नाट्य गीते लिहिणारी व्यक्ती एकच असावी असे नेहमी वाटे. तरीदेखील बुवांची व शांता बाई यांची भट्टी छान जमली व आपल्याला मिळाला, **'काटा रुते कुणाला'**,**'विकल मन आज झुरत असहाय'** अशा एक से बढकर एक गाण्यांचा सुरेल नजराणा! **'विकल मन आज झुरत असहाय**'हे नाट्य पद ‘सजनबीन कासे भई निरास’ या बंदिशीवर आधारलेले आहे.

बुवांची हटकून आठवण येते ती अजून दोन गाणी ऐकली की; पहिले आहे **'सर्वात्मका-सर्वेश्वरा'** (नाटक - **ययाति आणि देवयानी**) तर दुसरे आहे **'वैशाख वणवा'** या चित्रपटासाठी दत्ता डावजेकर यांनी संगीतबद्ध केलेले व बुवांनी गायलेले **'गोमू माहेरला जाते हो नाखवा'**

ययाती आणि देवयानी या नाटकातील **'प्रेम वरदान'** हे गाणे बुवांनी प्रथम त्रितालात बसवले होते. ते त्यांनी रामदास कामत यांना शिकविले देखील. पण ते ऐकल्यावर त्या चालीमुळे गाण्याचा योग्य परिणाम होत नाही असे कामत यांना वाटले. सुरुवातीला बुवांनी रामदास कामत यांचे बोलणे उडवून लावले पण जेव्हा कामत यांनी तिसऱ्या अंकातली कचाची भाषणे बुवांना ऐकवली तेव्हा त्यांना सूचना पटल्या. मग मूळ चाल न बदलता बुवांनी फक्त ताल बदलला म्हणजे त्रिताल बदलून झपतालमध्ये बांधली. बुवा हे असे खुल्या मनाने विचार करणारे होते

बुवा नुसते महान कलाकारच नव्हते तर लाख माणूस देखील होते. एकदा बुवांची मुलगी, मेखला खरेदीला गेली व तिने दुकानातील अर्धे अधिक ड्रेसेस दुकानदाराला दाखवायला सांगितले. त्यातील मोजकेच दोन ड्रेस विकत घेऊन जेव्हा मेखला बाहेर आली तेव्हा बुवांची प्रतिक्रिया काय होती माहित आहे? 'अग निदान दुकानातून बाहेर पडताना तू दुकानदाराला उरलेल्या ड्रेसेसच्या घड्या घालायला तरी मदत करायला हवी होती'

असे सुहृदय पंडित जितेंद्र अभिषेकी जेव्हा गेले तेव्हा त्यांच्या चाहत्यांना अनावर दुःख झाले. चाहत्यांच्या भावनेला वाट करून दिली ते या काव्यपंक्तींनी..

‘स्वर्गलोकींच्या सूरशय्येवर, अभिषेकी हा निजला रे । मंगेशाच्या गर्भकुडीतील, लामणदीप हा विझला रे ॥’

२१ सप्टेंबर बुवांचा जन्मदिवस असतो. 'हे स्वरांनो, चंद्र व्हा चांदण्यांचे कोष माझ्या, प्रियकराला पोचवा' असे म्हणण्याऐवजी बुवा, स्वर्गातून सदोदित नेहमी असेच म्हणत असतील 'हे स्वरांनो, चंद्र व्हा चांदण्यांचे कोष माझ्या, चाहत्यांना पोचवा'



## अंजाम ए महफ़िल

सुमन कल्याणपूर, उषा मंगेशकर, जितेंद्र अभिषेकी, अनुराधा , अनिल पौडवाल, मंगेश पाडगांवकर, सुधीर मोघे, जगदिश खेबुडकर, सुरेश भट अशा दिग्गजांनी सजवलेली प्रशांत यांची ही पाचवी मैफ़ल. त्यांची प्रत्येक मैफ़ल ही एक पंचतारांकित मेजवानीच असते. पण आजची मैफ़ल मराठमोळ्या निव्वळ दिग्गजांची होती. मराठी भाषा आणि महाराष्ट्र म्हणजे गुणीजनांची खाण. या खाणीतून निघालेल्यी एकेका रत्नाची प्रभावळ आपले अख्खे आयुष्य उजळून टाकायला पुरेशी आहे.

ज्या मराठी भाषेला लिळाधर स्वामी, नरेंद्र कवी, ज्ञानोबा, तुकोबा असा जबरदस्त पाया आणि कळस लाभला, त्या मराठी खाणीतून अजून अनेक रत्ने उदयाला यायची आहेत. येत आहेत. आपल्या आजूबाजूला आहेत. त्यांची प्रभा आणि प्रतिभा आपल्यापर्यंत जोडणारे पूल, व्यासपिठं उभी रहात आहेत. ई साहित्य प्रतिष्ठान त्यातलंच एक. हे व्यासपीठ नवनवीन लेखक कवी गायक, वक्ते, नाटककार आपल्यासमोर सादर करत आहे, आणि राहील. आपल्याकडून जास्तीत जास्त प्रोत्साहन आणि दाद मिळावी एवढीच अपेक्षा आहे.

कृपया आपण वाचाल ते प्रत्येक पुस्तक कसं वाटलं, त्यातलं काय आवडलं, अजून काय हवं होतं , हे सर्व लिहा. कळवत रहा. फ़ोन करा. फ़ेसबुकवर कमेंट द्या.

तुमच्या फ़र्माईशी आणि दाद यांवरच तर या खाणीतली रत्नं बाहेर येणार ना?

धन्यवाद

आपले कृपाभिलाषी

टीम ई साहित्य

